रविकांत साखरे, जामखेड.

□ जुन्या जमान्यातील अभिनेत्री बिब्बोने कोणकोणत्या चित्रपटांत नायिकेची भूमिका केली? नायक कोण?

– *मायाजाल*(निस्सार), *रंगोला राजपूत*(निस्सार), *मिल मजदूर*(जयराज), *सैरे परिस्तान* (निस्सार), *वासवदत्ता*(जयराज), *प्यार की मार*(नवीन याज्ञिक), *गरीब परिवार*(जयराज), *मनमोहन*(सुरेंद्र), *कॅप्टन कीर्तीकुमार*(मोतीलाल), *जागीरदार*(सुरेंद्र), *कझाक की लडकी*(सुरेंद्र), *कागद का शेर*(याकूब), *ग्रामोफोन सिंगर*(सुरेंद्र), *डायनामेट*(सुरेंद्र), *पोस्टमन*(कुमार), *थ्री हंड्रेड डेज ॲण्ड आफ्टर*(मोतीलाल), *वेतन*(कुमार), *भोले भाले*(प्रेम अदिब), *लेडीज ओन्ली*(सुरेंद्र), *सर्व्हिस लिमिटेड*(सुरेंद्र), *साधना*(प्रेम अदिब), *लक्ष्मी*(कुमार), *स्नेहबंधन*(ई. बिलमोरिया), *सुहाग*(कुमार), *अकेला*(कुमार), *मेरा राजा*(ई. बिलमोरिया) या चित्रपटात बिब्बो नायिकेच्या भूमिकेत चमकली.

विनया चवाथे, मुलुंड.

□ 'गुलमोहर अगर तुम्हारा नाम न होता...'(किशोर), 'हमने देखी है इन आँखो की महकती खुशबू...'(लता) ही दोन गाणी कोणत्या चित्रपटातील? कोणावर चित्रित झालीत?

– पहिले गाणे *देवता*त राकेश रोशन, सारिका यांच्यावर व दुसरे गाणे *खामोशी*त वहिदा रहमानवर चित्रित झालंय.

उल्हास सावंत, सावंतवाडी.

□ प्राण, प्रेम चोप्रा, डॅनी या खलनायकांनी नायक म्हणून कधी भूमिका केलीय का? खलनायक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट कोणता?

– प्राणने *खानदान*, *बिरहन*, *बरसात की एक रात* यासारख्या काही चित्रपटांत नायकांची भूमिका केलीय. *जिद्दी*त त्याने सर्वात प्रथम खलनायकाची भूमिका केलीय.

प्रेम चोप्राने कधी नायकाची भूमिका केलेली नाही. *वह कौन थी?* हा त्याचा खलनायकाची भूमिका असलेला पहिला चित्रपट. डॅनीने *मेरे अपने*त सकारात्मक भूमिका केली होती. *३६ घंटे*त तो सर्वात प्रथम खलनायक बनला.

राजश्री कुलकर्णी, विलेपार्ले, मुंबई.

□ अमिताभला जय हे नाव कोणत्या चित्रपटात मिळाले?

– जय नव्हे तर विजय हे अमिताभच्या भूमिकेचे लोकप्रिय नाव होते. ते *जंजीर*मध्ये त्याला सर्वप्रथम मिळाले.


जयदेव कोरगावकर, महाड

□ शम्मी कपूर, मनोजकुमार आणि राजकुमार यांचे पहिले चित्रपट कोणते? त्यांनी कोणकोणत्या चित्रपटांत दोघांनी वा तिघांनी एकत्र भूमिका केल्या आहेत?

– शम्मी कपूरचा पहिला चित्रपट *जीवनज्योती*. मनोजकुमारचा पहिला चित्रपट *कांच की गुडिया*. राजकुमारचा पहिला चित्रपट होता *रंगिली*. कोणत्याही चित्रपटात हे तिघे एकत्र चमकले नाहीत. मात्र शम्मी कपूर आणि राजकुमार *उजाला*मध्ये एकत्र दिसले तर मनोजकुमार आणि राजकुमार यांनी *नीलकमल*मध्ये एकत्र काम केलं होतं.

धनश्री पिंपळगावकर, इचलकरंजी.

□ संगीतकार रवी यांना कोणत्या चित्रपटासाठी पारितोषिक मिळालं आहे?



संगीतकार रवी

– संगीतकार रवी यांना *घराना* आणि *खानदान* या चित्रपटांसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळालेले आहेत.

वैजयंती आगाशे, डोंबिवली.

□ जॉय मुखर्जी याचा पहिला चित्रपट कोणता? त्याची नायिका कोण होती? जॉय मुखर्जीने दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते?

– जॉय मुखर्जी याचा पहिला चित्रपट होता *लव्ह इन सिमला*. यात साधना त्याची नायिका होती. जॉय मुखर्जीने *हम साया* आणि *छैला बाबू* या दोन चित्रपटांचं दिग्दर्शन केलं होतं.

नंदिनी सातपुते, पालघर.

□ अशोक सराफ आणि अलका कुबल या दोघांनी कोणकोणत्या चित्रपटांत एकत्र भूमिका केली? त्यांनी एकत्र भूमिका केलेले हिंदी चित्रपट कोणते?

– अशोक सराफ आणि अलका कुबल यांनी *तुझ्या वाचून करमेना*, *मधुचंद्राची रात्र*, *बाळाचे बाप ब्रह्मचारी*, *धरलं तर चावतंय*, *वाट पाहाते पुनवेची*, *जसा बाप तशी पोरं* आणि *सुना येती घरा* या चित्रपटांत एकत्र काम केलं. अशोक सराफने अनेक हिंदी चित्रपटांत अभिनय केला असला तरी अलका कुबल यांनी आजवर कधीही हिंदी चित्रपटांत काम केलेलं नाही.

जयश्री गोडबोले, अकोला.

□ वडील आणि मुलगा यांनी एकत्र काम केलेले चित्रपट कोणते?

– हिंदी चित्रपट सृष्टीत अशी अनेक उदाहरणं आहेत: *आवारा* (पृथ्वीराज कपूर-राज कपूर), *कल आज और कल* (पृथ्वीराज कपूर-राज कपूर-रणधीर कपूर), *बेजुबान* (अशोक कुमार-अरुणकुमार), *दूर गगन की छांव में*, *चलती का नाम जिंदगी*, *शाबास डॅडी*(किशोरकुमार-अमितकुमार), *राजकुमार*, *प्यार किया तो डरना क्या*(पृथ्वीराज कपूर-शम्मी कपूर), *पवित्र पापी*(बलराज साहनी-परिक्षित साहनी), *लव्हस्टोरी* (राजेंद्रकुमार-कुमार गौरव), *आनंद और आनंद* (देव आनंद-सुनील आनंद).

धनंजय जगताप, लालबाग, मुंबई.

□ हिंदी चित्रपटसृष्टीतली पहिली मराठी अभिनेत्री बनण्याचा मान कोणाला दिला जातो?

– अर्थातच दुर्गा खोटे यांना. बोलपटांचा काळ सुरू झाला आणि दुर्गा खोटे यांनी *ट्रॅप्ड* या हिंदी बोलपटात नायिकेचं काम करून आपल्या रुपेरी कारकीर्दीचा श्रीगणेशा केला.

दशरथ धनावडे, नाणार, रत्नागिरी.

□ *बुड्ढा मिल गया*ची नायिका कोण? तिची कौटुंबिक पार्श्वभूमी काय आहे?

– *बुड्ढा मिल गया*च्या नायिकेचं नाव अर्चना होतं. दिग्दर्शक हेमंत गुप्ता यांची ती मुलगी. त्यांच्याच *फेरी* या चित्रपटात ती बालकलाकार म्हणून चमकली. नंतर *बुड्ढा मिल गया*, *अनोखा दान* यांसारख्या मोजक्या चित्रपटांतून ती दिसली.